प्र.१ अ) "ललित साहित्यकृती ही लेखकाने आपल्या कल्पनेने निर्माण केलेली असते." या विधानाचा वा.ल. कुलकर्णी यांच्या निबंधाच्या आधारे परामर्श घ्या. (१५)

**किंवा**

ब) "साहित्य हा समाजाचा आरसा आहे." या विधानाची भालचंद्र नेमाडे यांच्या 'साहित्यकृतीतील अर्थव्यापार' या निबंधाच्या आधारे सविस्तर चर्चा करा.

प्र.२ अ) "साहित्याचे मूल्यमापन नैतिक मूल्यांच्या आधारे करता येते." लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या 'साहित्याचे मूल्यमापन' या निबंधाच्या आधारे साधार चर्चा करा. (१५)

**किंवा**

ब) "कवितेत कवी स्वतःच्या अनुभूतीचा स्वतःच ठाव घेत असतो." कुसुमावती देशपांडे यांच्या 'साहित्याचा आस्वाद' या निबंधाच्या आधारे सविस्तर लिहा.

प्र.३ अ) आस्वाद आणि समीक्षा यांच्यातील स्वरुपभेद गंगाधर पाटील यांच्या 'साहित्य-समीक्षेचे स्वरुप' या निबंधाच्या आधारे साधार स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

ब) "सावित्रीचे विश्व आपल्या मनातूनच पहायला हवे." सरोजिनी वैद्य यांच्या कादंबरी समीक्षेच्या आधारे सविस्तर लिहा.

प्र.४ टीपा लिहा. (प्रत्येक गटातील एक) (५)

अ) 'वाङ्मय' या संकल्पनेचे स्पष्टीकरण

**किंवा**

साहित्यकृतीतील तीन अंगे

ब) साहित्याचा आस्वाद (५)

**किंवा**

साहित्यिकाचा जीवनविषयक दृष्टीकोन

क) समीक्षेच्या व्याख्या (५)

**किंवा**

'ऐक जरा ना' कवितेची समीक्षा

प्र.५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पंधरा) (१५)

१. सौंदर्यपूर्ण, भावनात्मक आणि बौद्धिक ही कशाची अंगे आहेत?

२. कवी नारायण सुर्वे यांनी भाकरीला कशाची उपमा दिली आहे?

३. आदर्श साहित्यकृतीला काय म्हटले जाते?

PQ3ADT

४. साहित्यकृतीतून कशाचे दर्शन घडते ?

५. आधुनिक नवसमीक्षेतील एक तत्त्व लिहा.

६. बालकवींचे पूर्ण नाव लिहा.

७. समाजाचा आरसा कशाला म्हटले जाते ?

८. 'पुनर्आस्वाद्यमानता' हे कशाचे वैशिष्ट्य आहे ?

९. 'साहित्याचे मूल्यमापन' हा निबंध कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

१०. सौंदर्यवादी भूमिका कोणी मांडली ?

११. 'पासंग' या पुस्तकाच्या लेखिकेचे नाव लिहा.

१२. 'ऐक जरा ना' ही कविता कोणी लिहिली आहे ?

१३. सिग्मंड फ्रॉइड यांनी कोणता सिद्धांत मांडला ?

१४. 'एक नवे आकाश' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?

१५. 'वातचक्र' ही कविता कोणी लिहिली आहे ?

१६. 'सावित्री' या कादंबरीत सावित्रीने आपल्या प्रियकराला किती पत्रे लिहिली आहेत ?

१७. 'सावित्री' कादंबरीतील पहिल्या पत्रात राजम्माने कोणती गोष्ट सांगितली आहे ?

१८. 'सावित्री' कादंबरीतील घटना कोणत्या कालावधीत घडलेल्या आहेत ?

❀ ❀ ❀